ePaper

236 प्रवासी असलेल्या विमानाच्या इंजिनला आग



वर्ष - 9 । अंक - 159 UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™



पान 8 वरुन...

RO-KO 2027 चा वर्ल्डकप खेळणार?


WWW.MAHAENEWS.COM | गुरूवार, दि. 05 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## राष्ट्रपती राजवट रद्द : राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांची घोषणा!


# अशांत मणिपूरमध्ये “लोकशाही”

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**मणिपूर राज्यातील राष्ट्रपती राजवट मंगळवारी तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात आली. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी याबाबत अधिकृत अधिसूचना जारी केली. भाजपने युमनाम खेमचंद सिंग यांची मुख्यमंत्री म्हणून निवड केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. “राज्यात शांतता, सलोखा आणि घटनात्मक व्यवस्था प्रस्थापित होईल,” असा विश्वास राष्ट्रपतींनी व्यक्त केला. दीर्घकाळ चाललेल्या जातीय हिंसाचारानंतर राज्यात स्थिर सरकार स्थापन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**









केंद्र सरकारने मंगळवारी मणिपूर राज्यातील राष्ट्रपती राजवट तत्काळ प्रभावाने रद्द केल्याची अधिसूचना जारी केली. गृह मंत्रालयाकडून जारी करण्यात आलेल्या गॅझेट अधिसूचनेनुसार, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संविधानाच्या कलम ३५६(२) अंतर्गत मणिपूरसाठी लागू केलेली राष्ट्रपती राजवट मागे घेतली आहे. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. आता ४ फेब्रुवारी २०२६ पासून ती रद्द करण्यात आल्याचे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

माजी मुख्यमंत्री एन. बिरें सिंग यांनी ९ फेब्रुवारी २०२५ रोजी राजीनामा दिल्यानंतर, राज्यातील दीर्घकालीन जातीय हिंसाचार आणि राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. ३ मे २०२३ पासून मणिपूरमध्ये मैतेई आणि कूकी-झोमी समुदायांमध्ये झालेल्या हिंसक संघर्षांमध्ये शेकडो लोकांचा मृत्यू झाला असून सुमारे ६० हजारांहून अधिक नागरिक विस्थापित झाले आहेत. रोजगार आरक्षण, जमीन हक्क आणि आर्थिक सवलती या मुद्द्यांवरून तणाव तीव्र झाला होता.

दरम्यान, ३ जानेवारी रोजी मणिपूरचे नवे राज्यपाल म्हणून नियुक्त झालेले अजय कुमार भल्ला विविध समाजघटकांशी संवाद साधून राज्यात शांतता आणि सामान्य स्थिती प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.



> “ मणिपूरमध्ये लोकशाही प्रक्रिया पुन्हा सुरळीत सुरू होत असून, राज्यात शांतता, सलोखा आणि घटनात्मक व्यवस्था प्रस्थापित होईल, असा मला पूर्ण विश्वास आहे. केंद्र सरकार आणि राज्य प्रशासन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व विकासासाठी कटिबद्ध आहे.
>
> - श्रीमती द्रौपदी मूर्मू, राष्ट्रपती.

## युमनाम खेमचंद सिंग नवे मुख्यमंत्री...

दरम्यान, भाजपाने मंगळवारी मणिपूर विधानसभेच्या पक्षनेतेपदी दोन वेळा आमदार राहिलेले युमनाम खेमचंद सिंग यांची निवड केल्याची घोषणा केली. ते राज्याचे नवे मुख्यमंत्री असतील. भाजप आमदारांची बैठक दिल्लीत पार पडली, त्यात हा निर्णय घेण्यात आला. खेमचंद सिंग यांचा शपथविधी मंगळवारीच होणार आहे.खेमचंद सिंग यांच्यासोबत दोन उपमुख्यमंत्री असतील. त्यापैकी एक कूकी-झो समुदायातून आणि दुसरे नागा समुदायातून असतील. कांगपोकपीचे आमदार नेमचा किपगेन यांची उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर भाजपची सहयोगी पक्ष नागा पीपल्स फ्रंट लवकरच नागा समुदायातील उपमुख्यमंत्र्याचे नाव जाहीर करणार आहे. ६२ वर्षीय खेमचंद सिंग हे मैतेई समाजातील असून व्यवसायाने अभियंता आहेत. याआधी बिरें सिंग सरकारमध्ये त्यांनी नगर प्रशासन मंत्री म्हणून काम पाहिले होते. २०२२ मध्येही ते मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत होते.

# गॅस गळती नियंत्रणात; वाहतूक संथगतीने

## पुणे-मुंबई महामार्गावरील वाहतूक पूर्ववत होण्यास सुरुवात

**महाईन्यूज । पुणे**

**मुंबई – पुणे द्रुतगती महामार्गावर मंगळवारी सायंकाळी ५ वाजता गॅस टँकर उलटला आणि मोठी गॅस गळती झाली. त्यामुळे सायंकाळी ५ वाजल्यापासून महामार्ग वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला. तब्बल २० तास वाहतुकीसाठी बंद असलेल्या महामार्गावरून अखेर बुधवारी दुपारी ३ पासून अंशतः वाहतूक सुरू झाली.**



### पथकरात सूट

महामार्गावरून एका वाहिनेवरून दोन्ही बाजूची वाहतूक सुरू झाली आहे. महामार्गावर वाहनांच्या ९ ते १० किमी लांब रांगा लागल्या असून वाहतूक संथगतीने सुरू आहे. वाहनचालक – प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. त्यांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. तर पथकर वसुलीही थांबविण्यात आल्याची माहिती एमएसआरडीसीने दिली.

मुंबई वाहिनीवरून दोन्ही दिशेला जाणारी वाहतूक सुरू करण्यात आली. मात्र वाहतूक संथगतीने सुरू आहे. वाहतूक सुरू झाल्याने वाहनचालक-प्रवाशांना दिलासा मिळाला. दरम्यान, बुधवारी सायंकाळी ६ नंतर वाहतूक सुरळीत होण्याची शक्यता आहे. मुंबई – पुणे द्रुतगती महामार्गावर बोरघाटात बोगद्यानजीक मंगळवारी सायंकाळी ५ वाजता गॅस टँकरचा अपघात झाला. गॅस टँकर उलटला आणि ज्वलनशील प्रोपोलिन गॅसची मोठी गळती झाली. त्यानंतर तातडीने महामार्ग पूर्णपणे वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. त्यामुळे वाहतूक जुन्या मुंबई – पुणे महामार्गाने वळविण्यात आली. द्रुतगती महामार्गावरील वाहतूक मोठ्या संख्येने जुन्या महामार्गाने वळविल्याने खोपोलीपासून पुढे २० किमीपर्यंत वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या. अजूनही जुन्या महामार्गावर वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या आहेत. परिणामी, वाहनाचालक-प्रवासी, रुग्ण, विमानतळावर पोहचण्यासाठी निघालेल्या प्रवाशांचे हाल झाले. मंगळवारी ५ वाजल्यापासून बुधवारी दुपारी ३ वाजेपर्यंत महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प होती. आता गॅस गळती रोखण्यात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला (एमएसआरडीसी) यश आले आहे. गॅस गळती झाल्याबरोबर एमएसआरडीसीने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) पथकाला पाचरण केले. मात्र गॅस गळती रोखणे त्यांना शक्य झाले नाही. अत्यंत अवघड, आव्हानात्मक काम असल्याने या क्षेत्रातील तज्ज्ञांची गरज भासली. ही बाब लक्षात घेऊन एमएसआरडीसीने भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल), हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) आणि रिलायन्स कंपनीतील संबंधित तज्ज्ञांना बुधवारी सकाळी बोलवले. तज्ज्ञांचे पथक आल्यानंतर त्यांनी गॅस गळती रोखण्याच्या कामाला सुरुवात केली. दुपारी ३ वाजता गॅस गळती रोखण्यात तज्ज्ञांच्या पथकाला यश आले. गॅस गळती रोखल्यानंतर गॅस टँकर हटविण्याच्या कामाला आता सुरुवात करण्यात आली आहे. यासाठी आवश्यक ती यंत्रसामग्री मागवण्यात आली आहे. दोन तासात टँकर हटवण्यात येईल. त्यानंतर सायंकाळी ६ वाजल्यानंतर वाहतूक सुरळीत होईल, अशी माहिती एमएसआरडीसी (पुणे) अधीक्षक अभियंता राहुल वसईकर यांनी दिली. बुधवारी सायंकाळी ६ वाजल्यानंतर दोन्ही दिशेने वाहतूक सुरू होईल. मात्र आजघडीला ९ ते १० किमी लांब वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. त्यामुळे आज कोणीही मुंबई – पुणे प्रवास करू नये, गरज असल्यास पर्यायी मार्गाचा वापर करावा, असा पुनरुच्चार वसईकर यांनी केला. सायंकाळी महामार्गावरील वाहतूक सुरू होणार असली तरी वाहतूक नियमित होण्यासाठी आणखी काही वेळ लागण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

# पुण्याच्या भविष्यासाठी पुरंदर विमानतळ; देवेंद्र फडणवीस

**महाईन्यूज । पुणे**

**वेगाने होत असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे पुणे शहर व परिसर गुंतवणुकीचे आकर्षण बनले आहे. त्यामुळे पुणे शहर व परिसरात औद्योगिकरण वाढत आहे. नागरीकरणाचा वेगही गतिमान आहे, अशा परिस्थितीत भविष्यातील पुणे शहराची गरज लक्षात घेऊन पुरंदर विमानतळाची निर्मिती करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**



### या गावात भूसंपादनाची प्रक्रिया

पुणे जिल्ह्यातील वनपुरी, कुंभार वळण, उदाची वाडी, एखतपूर, मुंजवडी, खानवडी व पारगाव या सात गावात पुरंदर विमानतळासाठी भूसंपादन करण्यात येत आहे. या गावांमध्ये भूसंपादनासाठी गाव निहाय उपजिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी दर्जाचे भूसंपादन अधिकारी नियुक्त करण्यात आले.

विमानतळासाठी भूसंपादन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून कालमर्यादेत पूर्ण करून विमानतळ विकासाचा मोठा टप्पा पार करावा,असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थानी पुरंदर विमानतळ विकासकामांचा आढावा घेताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विमानतळ विकासासाठी निधी उपलब्धतेची विशिष्ट पद्धत ठरविण्यात यावी. भूसंपादनाकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कार्यवाही पूर्ण करावी. विमानतळ विकासामध्ये सिडको, नगरविकास विभाग यंत्रणांनी आपली जबाबदारी निश्चित करून भूमिका यशस्वीपणे पार पाडावी. विमानतळ निर्माण झाल्यानंतर हा परिसर 'डेव्हलपमेंट झोन' म्हणून पुढे येणार आहे. त्या अनुषंगाने सिडकोने परिसरात आत्ताच जमीन उपलब्धतेची खात्री करून घ्यावी. राज्यातील विमानतळाचा विकास करण्याची जबाबदारी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे आहे. कंपनीची क्षमता वृद्धी करून राज्यातील निर्माणाधीन असलेली सर्व विमानतळे विकासाकरिता कंपनीकडे देण्यात यावीत. पुरंदर विमानतळाच्या उर्वरित भूसंपादनाची अधिसूचना 'एमआयडीसी'ने काढावी तसेच निधीची उपलब्धतेबाबत विशिष्ट पद्धत ठरवण्यात यावी. विमानतळ विकासासाठी निधी उपलब्धतेचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीत आणावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. सद्यस्थितीत प्रस्तावित क्षेत्रापैकी १२१६ हेक्टर आर जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण करावी. या संयुक्त मोजणीचा, हरकतींचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. बैठकीस मख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, प्रधान सचिव (उद्योग) पी. अन्बळगन, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसू आदी उपस्थित होते. दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी बैठकीत सहभाग घेतला.

# जिल्हा रुग्णालय प्रशासनाला "डोस"

## आरोग्य व्यवस्था कोलमडली : आमदार शंकर जगताप संतापले!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**सांगवी जिल्हा रुग्णालयाच्या दुरावस्थेवरुन बुधवारी आमदार शंकर जगताप यांनी रुग्णालय प्रशासनाची चांगली झाडाझडती घेतली. "आरोग्य व्यवस्थेची अक्षरशः हेळसांड मांडली आहे". अशा शब्दात त्यांनी प्रशासनाला जाब विचारला. डॉक्टरांची कमी संख्या, सोलर सिस्टिम कार्यान्वित नसणे, एमआरआय सेंटर बंद असल्याबद्दल रुग्णालय प्रशासनाला धारेवर धरले.**





सांगवी जिल्हा रुग्णालयाच्या कामकाजाबाबत बुधवारी आमदार शंकर जगताप यांनी अचानक पाहणी दौरा दरम्यान आमदार जगताप म्हणाले, हे रुग्णालय पुणे जिल्ह्याच्या आरोग्य सेवेच्या केंद्रस्थानी आहे. अनेक प्रकारच्या वैद्यकीय सुविधा मोफत दरात उपलब्ध असल्यामुळे उपचारांसाठी जिल्ह्यातून या ठिकाणी रुग्णांची मोठी गर्दी असते. मात्र अनेक दिवसांपासून या रुग्णालयाच्या दुरावस्थेबाबतच्या तक्रारी केल्या जात होत्या.

या संदर्भात वारंवार नागरिकांची निवेदने येत होती. त्या अनुषंगाने आज अचानक रुग्णालयाला भेट दिली. रुग्णालयाला भेट दिल्यानंतर नागरिकांनी केलेल्या तक्रारी पेक्षाही विदारक अवस्था दिसून आली. ठिकठिकाणी अस्वच्छता, मोडकळीस आलेली आसन व्यवस्था, घाणीचे साम्राज्य, रुग्णालयाच्या आवारात सांडलेले सांडपाणी अशा अनेक तक्रारी निदर्शनास आल्या मुख्य म्हणजे डॉक्टरांच्या उपस्थितीची संख्या देखील नियमाप्रमाणे नव्हती असे आमदार जगताप यांनी सांगितले

यावेळी अति दक्षता विभाग, एक्स-रे सेंटर, एम आर आय सेंटर या ठिकाणी पाहणी केली असता एम आर आय सेंटर बंद असल्याचे दिसून आले तर आयसीयू कक्षा साठी प्रचंड वेटिंग देखील दिसून आली. बऱ्याचदा रुग्णांना सिविल हॉस्पिटल मधून ससून रुग्णालयात रेफर केले जाते अशा तक्रारी देखील नागरिकांनी केल्या डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे रुग्णालयातून अनेक पेशंट इतरत्र पाठवले जातात असे देखील यावेळी निदर्शनास आले.

> सांगवी जिल्हा रुग्णालयाच्या कामकाजाबाबत अनेक अडचणी, तक्रारी माझ्यापर्यंत आल्या. या तक्रारींची शहानिशा करण्यासाठी आज अचानक रुग्णालयाची पाहणी केली. यामध्ये सुधारणा करण्याबाबत डॉक्टर,कर्मचारी सर्वांना सूचना केल्या आहेत. दरम्यान या रुग्णालयातील एका रुग्णाच्या मृत्यूच्या घटनेबाबत मुंबई अधिवेशनात राज्य शासनाचे लक्ष वेधणार आहे.
>
> – **शंकर जगताप,** आमदार, चिंचवड विधानसभा.

### रुग्णालयातील शवागार बंद अवस्थेत...

या रुग्णालयातील "शवागार" बंद आहे. याशिवाय सोलर सिस्टिम बसवण्यात आलेली आहे. मात्र त्याचे नेट मीटरिंग केलेले नसल्यामुळे अजूनही या प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला नाही. एकीकडे सांगवी जिल्हा रुग्णालयात अनेक सुविधांची वाताहत आहे. याही पलीकडे येथील आरोग्य सेवक असलेले डॉक्टर, नर्स, विविध कर्मचारी या सर्वांनीच आरोग्य व्यवस्था गॅसवर ठेवण्याचे काम केले असल्याचे आमदार म्हणाले. अति दक्षता विभागात देखील कोणतेही सुरक्षेचे नियम पाळले जात नव्हते. बाहेरून आलेले कर्मचारी, पेशंटचे रुग्ण, अगदी डॉक्टर सुद्धा चप्पल बूट घालून फिरत असल्याचे यावेळी निदर्शनास आले.

# महापालिकेच्या आरोग्य सुविधा केंद्रांना राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थेरगाव, जिजामाता आणि नेहरूनगर या तीन शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकांनुसार (एनक्यूएएस) राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाले आहे. हे मानांकन मिळवणारी पिंपरी चिंचवड महापालिका ही महाराष्ट्रातील पहिली महापालिका ठरली आहे.**



या प्रमाणपत्रामुळे वैद्यकीय विभागाच्या गुणवत्तापूर्ण सेवांची राष्ट्रीय स्तरावर नोंद झाली असून, नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांच्या विश्वासार्हतेलाही अधिक बळ मिळाले आहे.

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन (एनक्यूएएस) हे संक्रमण नियंत्रण, क्लिनिकल केअर, रुग्ण हक्क, रुग्णालय व्यवस्थापन व सेवा सुधारणा अशा महत्त्वपूर्ण निकषांवर आधारित असते. या सर्व निकषांची पूर्तता करत संबंधित केंद्रांनी आरोग्य सेवांच्या गुणवत्तेत आपला उच्च दर्जा सिद्ध केला आहे. महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली या आरोग्य सुविधा केंद्रांना हे यश मिळवून देण्यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलवडे व शहर गुणवत्ता आश्वासन समन्वयक (सीक्यूएसी) डॉ. कोमल बनसोडे आणि संपूर्ण टीम यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न केले. तसेच डॉ. छाया शिंदे आणि डॉ. शैलजा भावसार यांचेही विशेष सहकार्य लाभले.

> भारत सरकारतर्फे मिळालेले राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र (एनक्यूएएस) हे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य सेवेत सातत्याने होत असलेल्या सुधारणा आणि गुणवत्तेच्या बांधिलकीचे द्योतक आहे. महापालिकेच्या आरोग्य सुविधा केंद्रांनी मिळवलेले हे यश संपूर्ण शहरासाठी अभिमानास्पद आहे.
>
> – **विजयकुमार खोराटे,** अतिरिक्त आयुक्त, पिं.चिं. मनपा.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना मिळालेले राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र हे वैद्यकीय विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या संयुक्त प्रयत्नांचे फलित आहे. नागरिकांना उच्च दर्जाची, सुरक्षित आणि रुग्ण-केंद्रित सेवा देण्याचा आमचा संकल्प यामुळे अधिक दृढ झाला आहे.
>
> – **डॉ. लक्ष्मण गोफणे,** आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका

### आरोग्य सेवांवरील नागरिकांचा वाढता विश्वास

महापालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांमध्ये स्वच्छता, सेवा-सुविधा आणि बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट या प्रक्रियांना जागतिक आरोग्य संघटना (डब्लूएचओ) आणि भारत सरकारच्या मानकांनुसार काटेकोरपणे अंमलात आणले जाते. नियमित निर्जंतुकीकरण, प्रतीक्षालयांची स्वच्छता, ओपीडी व्यवस्थापन आणि सुरक्षित उपचार वातावरणामुळे महापालिकेच्या आरोग्य सुविधांवर नागरिकांचा विश्वास वाढत आहे.



## भूमिका

**मणिपूरमध्ये जवळपास वर्षभर चाललेल्या राष्ट्रपती राजवटीचा शेवट होत पुन्हा लोकनियुक्त सरकार सत्तेत येत आहे. कागदोपत्री पाहता हा लोकशाही प्रक्रियेचा विजय मानता येईल; मात्र वास्तवाच्या कसोटीवर हा निर्णय अजूनही अनेक प्रश्न उपस्थित करतो.**

# मणिपूरात राष्ट्रपती राजवटीचा शेवट!



गेल्या दोन वर्षांपासून हिंसाचार, अस्थिरता आणि अविश्वासाच्या छायेत जगणाऱ्या मणिपूरसाठी राष्ट्रपती राजवटीची समाप्ती ही समाधानाची नव्हे, तर सावध आशेची घटना आहे.

मेईतेई आणि कुकी-झोमी समुदायांतील हिंसक संघर्षामुळे मणिपूरचे सामाजिक व प्रशासकीय चित्र पूर्णपणे ढासळले. शेकडो निष्पाप नागरिकांनी आपले प्राण गमावले, सुमारे ६० हजारांहून अधिक लोकांना विस्थापनाचा सामना करावा लागला, तर राज्यातील प्रशासनावरचा लोकांचा विश्वास संपुष्टात आला. तत्कालीन मुख्यमंत्री एन. बीरेन सिंग यांच्या राजीनाम्यानंतर घटनात्मक यंत्रणा कोलमडल्याचे कारण देत राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. त्या पार्श्वभूमीवर आता पुन्हा सत्तास्थापना होणे ही एक महत्त्वाची घडामोड असली, तरी ती पुरेशी आहे का, हा खरा प्रश्न आहे.

भाजपने युमनाम खेमचंद सिंग यांना मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी दिली असून, उपमुख्यमंत्रीपदाची सामाजिक समतोल साधणारी मांडणी करण्यात आली आहे. कागदावर ही रचना समावेशक वाटत असली, तरी मणिपूरच्या जखमा इतक्या खोल आहेत की केवळ सत्तेतील प्रतिनिधित्वाने त्या भरून निघणे अशक्य आहे. हिंसाचाराने तुटलेली सामाजिक वीण, समुदायांमधील दुरावा आणि परस्पर संशय हे केवळ राजकीय नियुक्त्यांनी मिटणारे प्रश्न नाहीत.

मणिपूरचे संकट हे केवळ कायदा-सुव्यवस्थेपुरते मर्यादित राहिलेले नाही. ते मानवी हक्क, न्याय आणि सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न बनले आहे. विस्थापितांचे सुरक्षित पुनर्वसन, जळालेल्या घरांची भरपाई, महिलांवरील अत्याचारांच्या प्रकरणांतील निष्पक्ष चौकशी, तसेच दोषींवर कठोर कारवाई—या बाबींवर ठोस पावले उचलल्याशिवाय विश्वास पुनर्स्थापित होणार नाही. यासोबतच बेकायदा शस्त्रांचा साठा नष्ट करणे आणि सशस्त्र गटांवर नियंत्रण मिळवणे ही सरकारपुढील मोठी आव्हाने आहेत.

राष्ट्रपती राजवट उठवली म्हणजे केंद्र सरकारची जबाबदारी संपली, असे मानणे घातक ठरेल. ईशान्येकडील हे सीमावर्ती राज्य केवळ मणिपूरचे नव्हे, तर संपूर्ण देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील आहे. केंद्र आणि राज्य यांच्यातील समन्वय, सुरक्षायंत्रणांची संवेदनशील भूमिका आणि दीर्घकालीन राजकीय संवाद आवश्यक आहे. केवळ पोलिसी उपाय नव्हे, तर विश्वास निर्माण करणारी राजकीय आणि सामाजिक प्रक्रिया सुरू करणे ही काळाची गरज आहे.

मणिपूरमध्ये लोकशाही औपचारिकरीत्या परतली असली, तरी सामाजिक सलोखा अजूनही दूर आहे. राष्ट्रपती राजवटीचा शेवट हा संकटाचा शेवट नसून, खऱ्या परीक्षेची सुरुवात आहे. नवे सरकार सत्ता टिकवण्यात नव्हे, तर जखमा भरून काढण्यात, विश्वास पुनर्स्थापित करण्यात आणि शांतता प्रस्थापित करण्यात यशस्वी ठरते का, यावरच मणिपूरचे भवितव्य अवलंबून आहे.

लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसून, ती सुरक्षितता, न्याय आणि समतेची हमी असते—मणिपूरला आज त्याच खरी लोकशाहीची गरज आहे.

## प्रासंगिक »

### दूरदृष्टी

***एकदा बादशहा अकबराने दरबारात एक विचित्र प्रश्न विचारला. त्यांनी जमिनीवर एक रेषा काढली आणि म्हणाले, "ही रेषा न पुसता किंवा न तोडता छोटी करून दाखवा."***

सगळे मंत्री गोंधळले. कोणी रेषेकडे पाहू लागले, कोणी विचारात पडले; पण कोणालाही उपाय सुचला नाही. वेळ जात होता आणि दरबार शांत झाला होता. तेव्हा बीरबल पुढे आला. त्याने शांतपणे अकबरांची परवानगी घेतली. बीरबलने त्या रेषेजवळच अजून एक, आधीच्या रेषेपेक्षा मोठी रेषा काढली. मग तो अकबरांकडे वळून म्हणाला, "महाराज, मी पहिली रेषा लहान केलेली नाही; पण आता ती आपोआप छोटी वाटते." हे ऐकून अकबर हसले. दरबारात टाळ्यांचा कडकडाट झाला. अकबर म्हणाले, "बीरबल, तू पुन्हा सिद्ध केलेस की खरी हुशारी म्हणजे समस्या न तोडता, योग्य दृष्टीकोन बदलणे."

तात्पर्य : समस्या थेट मोडण्याऐवजी, विचारांची दिशा बदलली तर सोपा आणि शहाणा मार्ग सापडतो.

गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये ऑस्ट्रेलियानं एक ऐतिहासिक कायदा मंजूर केला. त्यानुसार १६ वर्षांखालील मुलांसाठी इन्स्टाग्राम, टिकटॉक, फेसबुकसारखे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स वापरण्यावर बंदी घालण्यात आली.

# मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी!

सोशल मीडिया किती धोकादायक आहे आणि मुलांचा मेंदू त्यामुळे किती सुस्त आणि आळशी होतो आहे, हे अनेकानेक संशोधनांतून सिद्ध झाल्यामुळे अनेक देश आता मुलांसाठी सोशल मीडिया वापराबाबत अतिशय गंभीर झाले आहेत.

ऑस्ट्रेलियानंतर आता फ्रान्सनेही मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याची पूर्ण तयारी केली आहे. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी नुकतंच जाहीर केलंय, फ्रान्समध्ये सप्टेंबरपूर्वी १५ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घातली जाईल. मॅक्रॉन म्हणाले, आमच्या देशातील मुलांचा मेंदू विकाऊ नाही. मुलांसाठी सोशल मीडियावर निर्बंध असतील आणि हायस्कूलमध्ये मोबाइल फोनवरही बंदी असेल. हा नियम मुलं, पालक आणि शिक्षक या सर्वांसाठी पूर्णपणे स्पष्ट असेल.




फ्रान्सचा हा निर्णय अशा वेळी आलाय, जेव्हा पाश्चिमात्य देशांमध्ये मुलांना सोशल मीडियापासून वाचवण्यासाठी कडक कायदे करण्याचे प्रयत्न वेगाने सुरू आहेत. मॅक्रॉन यांच्या घोषणेनंतर काही दिवस आधीच ब्रिटन सरकारनंही सांगितलं होतं की, मुलांना ऑनलाइन सुरक्षित ठेवण्यासाठी अनेक पर्यायांवर विचार सुरू आहे.

यामध्ये १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचाही समावेश आहे. फ्रान्समध्ये या प्रस्तावाचं नेतृत्व मॅक्रॉन यांच्या पक्षाच्या खासदार लॉर मिलर करत आहेत. त्यांनी सांगितलं की, सध्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वयाची योग्य तपासणी होत नाही. कोणतीही व्यक्ती फक्त जन्मतारीख टाकून सहज अकाउंट बनवू शकते. सरकारची इच्छा आहे की, युरोपियन डिजिटल सर्व्हिसेस ॲक्टअंतर्गत प्लॅटफॉर्मवर कठोरपणे खरी वयाची पडताळणी बंधनकारक केली जावी. याचा अर्थ असा होईल की, युजरला तो १५ वर्षांहून मोठा आहे की नाही, हे सिद्ध करावं लागेल. ऑस्ट्रेलियात मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घातल्याचा अतिशय मोठा सकारात्मक परिणाम पाहायला मिळाला.

ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी सांगितलं, १६ वर्षांखालील मुलांशी संबंधित सुमारे ४७ लाख सोशल मीडिया अकाउंट बंद किंवा हटवण्यात आले आहेत. बंदी लागू होण्याच्या अगोदर अल्बानीज यांनी ऑस्ट्रेलियन किशोरवयीन मुलांना आवाहन केलं होतं की त्यांनी एखादा नवा खेळ खेळणं सुरू करावं, एखादं संगीतवाद्य शिकावं किंवा पुस्तकांचं वाचन करावं, त्यांची गोडी लावावी.

## ।। अभंगवाणी ।।



ज्याचे हाती राम, त्यासी काय कमी।
उधळोनि संसार, विसरोनि नेम॥१॥

तुका म्हणे पाहा, सांडिली चिंता।
रामनाम जपता, होय समाधान॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भूसंपादनाला गती द्या; जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

## पायाभूत सुविधा व औद्योगिक प्रकल्पांसाठी जलद भूसंपादनाचे निर्देश

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यातील पायाभूत सुविधा तसेच औद्योगिक विकासासाठी आवश्यक जमीनीचे तातडीने भूसंपादन करा. ही प्रक्रिया गतीने आणि पारदर्शक पद्धतीने राबवावी तसेच प्रकल्पांसाठी जमीन देणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.**



महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) विविध प्रकल्पांसाठी सुरू असलेल्या भूसंपादनाचा आढावा फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत ( दूरचित्र संवादाच्या माध्यमातून), मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलरासु, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांच्यासह सर्व संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी (दूरचित्र संवादाच्या माध्यमातून ) उपस्थित होते. रस्ते व अन्य पायाभूत सुविधा प्रकल्प तीन वर्षात पूर्ण झाले पाहिजेत. मात्र या प्रकल्पांसाठी आवष्यक भूसंपादन अतिशय संथगतीने सुरु असल्याबदद्ल फडणवीस यांनी प्रारंभीच तीव्र नाराजी व्यक्त करीत या प्रकल्पांसाठी आवश्यक जमीनी लवकर ताब्यात घेण्याचे आदेश दिले. राज्यात औद्योगिक विकासासाठी विविध विभागांमध्ये एकूण ८ हजार९६९ एकर क्षेत्र उपलब्ध असून नव्याने २० हजार ४३१ एकर जमीन ताब्यात घेण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. त्यावर औद्योगिक गुंतवणुकीसाठी मोठी मागणी येत असून उद्योजकांना लागणाऱ्या जागेचा विचार करुन एमआयडीसीने एक लाख एकर जागा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवावे. मुंबई-पुणे-नागपूर बरोबरच नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आदी भागांमध्ये गुंतवणूकदारांकडून जमिनीची मागणी वाढत आहे. याद्दष्टीने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादनाच्या कामांना गती द्यावी. यासाठी शासन स्तरावरून आवश्यक ते साहाय्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. विविध जिल्ह्यातील 'एमआयडीसी'च्या भूसंपादनाबरोबरच 'एमएसआरडीसी'कडील शक्तिपीठ एक्स्प्रेस वे, विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, नागपूर-गोंदिया एक्स्प्रेस वे, भंडारा-गडचिरोली एक्स्प्रेस वे, नागपूर चंद्रपूर एक्स्प्रेस वे, नवेगाव-सुरजागड मिनरल कॉरिडॉर, जालना नांदेड एक्स्प्रेस वे आदी प्रकल्पांच्या सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेचाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी आढावा घेतला. राज्यात सुरू असलेले सर्व प्रकल्प येत्या तीन वर्षात पूर्ण होतील, असे नियोजन करावे. यासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती द्यावी. त्याचबरोबर वनक्षेत्र नसलेल्या जास्तीत जास्त सलग जागेचे भूसंपादन करुन ती उद्योजकांना उपलब्ध करुन द्यावीत. याशिवाय, विविध विभागाकडील शासकीय जमिनी औद्योगिक वापरासाठी विनामूल्य हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव सादर करावा, यामुळे उद्योजकांना कमी दरात भूखंड उपलब्ध होऊन राज्यातील औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असेही फडणवीस यांनी सांगितले.

उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांनी, कोकणातील भूसंपादन प्रक्रियेदरम्यान कुठेही वन जमिनीचे संपादन केले नसल्याची माहिती दिली. चंद्रपूर जिल्ह्यातील अतिरिक्त गोंडपिंपरी औद्योगिक क्षेत्रात उद्योजकास जमीन उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव मान्यतेसाठी प्राप्त झाला आहे. या प्रस्तावास मान्यता देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

# सुनेत्रा पवारांचा शपथविधी बेकायदेशीर? पुन्हा शपथविधी होणार

**महाईन्यूज । नागपूर**

**सुनेत्रा पवार यांनी ३१ जानेवारीला उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांच्या रुपाने महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री लाभल्या आहेत. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना गोपनियतेची शपथ दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी 'अजितदादा अमर रहे'च्या घोषणा देण्यात आल्या.**



### बेकायदेशी ठरण्याचे कारण काय दिले?

०१/०२/२०२६ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सुनेत्रा अजित पवार यांना दिलेल्या शपथविधीमध्ये सुनेत्रा अजित पवार यांनी उप-मुख्यमंत्री पदाची शपथ घेत असल्याचे दोनदा म्हटले आहे. जे की असंवैधानिक व भारतीय संविधांच्या विरोधात आहे. भारतीय संविधानात कुठेही उप-मुख्यमंत्री पदाची तरतूद नाही. त्यामुळे सुनेत्रा अजित पवार यांनी उप-मुख्यमंत्री पदाची घेतलेली शपथ आपोआपच बेकायदेशीर आहे म्हणून सुनेत्रा अजित पवार यांना रीतसर भारतीय संविधानाच्या ३ अनुसूचित राज्याच्या मंत्र्याकरिता पदाच्या शपथेचा नमुना दिला आहे. त्यानुसार शपथ देऊन त्यांच्याकडे मुख्यमंत्र्यांनी देलेल्या खात्याची जबाबदारी यावी. अन्यथा महाराष्ट्रासारख्या राज्यात ज्यांच्यावर भारतीय संविधानाच्या रक्षणाची जबाबदारी आहे. त्यांच्याकडूनच खुलेआम भारतीय संविधानाचे उल्लंघन होत आहे असा संदेश जाईल.

मात्र, या चार दिवसांतच त्यांचा शपथविधी बेकायदेशीर ठरला असे पत्र खुद्द राज्यपालांना देण्यात आले असून पुन्हा शपथ घ्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे सुनेत्रा पवार यांचा शपथविधी पुन्हा होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. याचे नेमके कारण काय? पाहूया.

वर्धा येथील ॲड. हर्षवर्धन शोभा बाबाराव गोडघाटे यांनी राज्यपालांना एक पत्र दिले आहे. यामध्ये शपथविधी कसा बेकायदेशीर आहे हे सांगितले. त्यांच्या पत्रानुसार, सुनेत्रा अजित पवार यांचा राजभवन येथे उप-मुख्यमंत्री पदाचा शपथविधी झाला. तो सर्व शपथविधी सर्व प्रसार माध्यमांवर लाईव्ह प्रसारित केला होता. त्या संदर्भात राज्यपाल यांचे पत्र क्रमांक एल बी/ॲडमिन-२०२६/ओर्थ-डीसीएम/सीआर-०१३/१७२ सोशल मिडिया मधून मिळाले. त्यात सुद्धा उप-मुख्यमंत्री पदाचा उल्लेख आहे. राज्यपाल यांच्या कार्यालयातून सुद्धा ३१ जानेवारीला प्रसिद्धी पत्रक देण्यात आले. त्यातही उप-मुख्यमंत्री असा उल्लेख आहे. परंतु भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६४ नुसार मंत्र्यासंबधी अन्य तरतुदींमध्ये मुख्यमंत्री, राज्यपालाकडून नियुक्त केला जाईल आणि इत्तर मंत्री मुख्यमंत्र्यांच्या सल्यानुसार राज्यपालांकडून नियुक्त केले जातील अस उल्लेख आहे. राज्यपालाची मर्जीअसे पर्यंत ते मंत्री पद धारण करतील. मंत्र्याने आपले पद ग्रहण करण्यापूर्वी राज्यपाल त्या प्रयोजनार्थ तिसऱ्या अनुसूचीमध्ये दिलेल्या नमुन्यानुसार त्यास पदाची व गोपनियतेची शप्पथ देईल अशी तरतूद आहे. भारतीय संविधानाच्या तिसऱ्या अनुसूचित राज्याच्या मंत्र्याकरिता पदाच्या शपथेचा नमुना दिला आहे. तो पुढीलप्रमाणे,

"मी– ईश्वर साक्ष शपथ घेतो की / गांभीर्य पूर्वक प्रतिज्ञा करतो की, कायद्याद्वारे स्थापित झाले आहे अशा भारताच्या संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन. (मी भारताची सार्वभौमता व एकात्मता उन्नत राखीन) मी....... राज्याचा मंत्री म्हणून माझी कर्तव्ये निष्ठापूर्वक व सदसदविवेक बुद्धीने पार पाडीन आणि संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निष्पक्षपातीपणे तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किवा आकस न बाळगता न्याय वागणूक देईल.

# उड्डाणानंतर विमानाच्या इंजिनला आग

## २३६ प्रवाशांसह विमानाचे कोलकात्यात इमर्जन्सी लँडींग

महाईन्यूज । कोलकाता

**पश्चिम बंगालच्या कोलकाता विमानतळावर टर्कीश एअरलाईन्सच्या विमानाचे इमर्जन्सी लँडींग करण्यात आले आहे. काठमांडूहून इस्तंबूलला जाणाऱ्या विमानाच्या उजव्या इंजिनात आग लागल्याचा संशय आल्यानंतर विमानाला आपत्कालीन परिस्थितीत कोलकात्यात उतरविण्यात आले. यानंतर विमानातील सर्व २३६ प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.**






कोलकाताच्या नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावरील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, काठमांडू ते इस्तंबूल प्रवास करणाऱ्या विमानाला आपत्कालीन परिस्थितीत विमानतळावर उतरण्याची परवानगी देण्यात आली. विमानाच्या कॅप्टनने कोलकाता एटीसीला सांगितले की, उजव्या इंजिनमध्ये आग लागल्याचा संशय आला होता. यानंतर दुपारी २ वाजून ४९ मिनिटांनी कोलकाता विमानतळावर लँडींग करण्यात आले.

कोलकाता विमानतळावरील अधिकाऱ्यांनी सांगितले की, विमानातील २२५ प्रवासी आणि ११ क्रू सदस्य सुस्थितीत असून त्यांना कोणतीही दुखापत झालेली नाही. विमान अद्याप विमानतळावरच असून त्याची तांत्रिक तपासणी सुरू आहे.

इस्तंबूलला जाणाऱ्या THY-७२७ या विमानाने दुपारी १.२९ वाजता नेपाळच्या त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावरून (TIA) उड्डाण केले. चार मिनिटांतच क्रूला उजव्या इंजिनमध्ये बिघाड झाल्याचे समजले. नेपाळच्या नागरी विमान वाहतूक प्राधिकरणाचे (CAAN) उपप्रवक्ते ज्ञानेंद्र भूल यांच्या मते, वैमानिकाने ताबडतोब काठमांडू टॉवरला माहिती दिली आणि सदर इंजिन बंद केले.

### मुंबई विमानतळावरही विमान एकमेकांना घासले

मंगळवारी रात्री मुंबई विमानतळावरही दोन विमानांचे पंख एकमेकांना घासल्याची घटना घडलीहोती. मुंबई विमानतळावरील टॅक्सीवेवर एअर इंडिया आणि इंडिगो विमानांचे पंख एकमेकांना घासले गेले. एअर इंडियाच्या टेक-ऑफपूर्वी आणि इंडिगो विमानाच्या लँडिंगनंतर टॅक्सीगदरम्यान दोन्ही विमानांच्या पंखांचा परस्पर संपर्क झाला. या घटनेतही सर्व प्रवासी सुरक्षित आहेत, असे निवेदन दोन्ही एअरलाइन्सही प्रसिद्ध केले.


### अजित पवारांच्या अपघातानंतर चिंता वाढल्या

जून २०२५ मध्ये अहमदाबाद येथे एअर इंडियाच्या विमान अपघातानंतर विमान वाहतुकीच्या सुरक्षेबाबतची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. विमान वाहतुकीबाबत वाढत्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर ही आपत्कालीन लँडींग करण्यात आली आहे. २८ जानेवारी रोजी व्हीएसआर व्हेंचर्सद्वारे चालवले जाणारे लिअरजेट ४५ चार्टर विमान बारामती येथे लँडिंग करताना कोसळले. या अपघातात माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) व्हीएसआर व्हेंचर्सची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

# राजस्थानमध्ये फिरण्यासाठी आलेल्या दोन ब्रिटिश पर्यटकांना भारत सोडण्याचे आदेश

महाईन्यूज । बंगळुरु

**राजस्थानमध्ये पर्यटनासाठी आलेल्या दोन ब्रिटिश पर्यटकांना गुन्हे अन्वेषण विभागाच्या कारवाईला सामोरे जावे लागले आहे. राजस्थानच्या अजमेर जिल्ह्यातील पुष्कर येथे पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ आणि इस्रायलच्या विरोधात पोस्टर लावल्यामुळे त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली असून त्यांना तात्काळ भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दोघांवरही व्हिसाच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.**



अजमेरच्या गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस अधीक्षक राजेश मीणा यांनी सांगितले की, लुइस गॅब्रियल डी (३६) आणि त्याची मैत्रीण अनुशी एम्मा क्रिस्टीन (३६) हे दोघे राजस्थानात पर्यटनासाठी आले होते. यावेळी त्यांनी राजस्थानच्या अजमेर येथे वेगवेगळ्या जागांवर इस्रायल विरोधी आणि पॅलेस्टाइनच्या समर्थनार्थ पोस्ट चिकटवले. यानंतर जिल्हा पोलिसांच्या मदतीने हे पोस्टर हटविण्यात आले.

या ब्रिटिश नागरिकांनी राजस्थानच्या पुष्कर येथेही पोस्ट चिकटवले होते. पुष्करमध्ये मोठ्या संख्येने इस्रायली पर्यटक येत असतात. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, याठिकाणी दरवर्षी १० ते १२ हजार इस्रायली पर्यटक भेट देतात. सध्या पुष्करमध्ये जवळपास २००० इस्रायली पर्यटक आहेत.

दोन्ही ब्रिटिश पर्यटकांविरोधातील आरोप सिद्ध झाल्यानंतर त्यांच्याविरोधात 'इमिग्रेशन अँड फॉरेनर्स अ‍ॅक्ट, २०२५' नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आणि त्यांना भारत सोडण्याचे निर्देश देण्यात आले.

२१ जानेवारी रोजी स्थानिक अधिकाऱ्यांना राजस्थानमध्ये विविध ठिकाणी स्टिकर्स चिकटवल्याचे लक्षात आले. त्यानंतर हा प्रकार समोर आला. याची चौकशी करण्यासाठी सीआयडी पथक नेमण्यात आले. सीआयडीने म्हटले की, अशाप्रकारचे स्टिकर्स लावणे हे गंभीर तर आहेच, शिवाय यातून पर्यटकांच्या व्हिसा नियमांचेही उल्लंघन झाले आहे.

पोलीस अधीक्षक राजेश मीणा म्हणाले की, भारतीय भूमीवर असताना इतर राष्ट्रांचा अनादर करण्याच्या कृतींमध्ये सहभागी होणे, हे व्हिसा नियमांचे स्पष्ट उल्लंघन आहे.

# नव्या सीरिजमध्ये 'धकधक गर्ल'चा ग्लॅमरस अंदाज



माधुरी दीक्षितने गेली अनेक वर्षे बॉलीवूड चित्रपटांतून प्रेक्षकांचा मनोरंजन केले. अभिनय आणि नृत्य यामुळे तिचा मोठा चाहतावर्ग निर्माण झाला. तिच्या अनेक भूमिकांचे वेळोवेळी कौतुक होताना दिसते. काही दिवसांपूर्वीच माधुरी दीक्षितने ओटीटीवर पदार्पण केले. 'मिसेस देशपांडे' या वेब सीरिजमधून तिने ओटीटीवर पदार्पण केले आहे. नेहमीपेक्षा एका वेगळ्या भूमिकेत अभिनेत्री दिसली. ती एका सिरियल किलरच्या भूमिकेत दिसली. तिच्या भूमिकेचे मोठ्या प्रमाणात कौतुक झाल्याचे पाहायला मिळाला.

आता अभिनेत्री पुन्हा एका नवीन भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. माँ बहन या वेब सीरिजमधून अभिनेत्री प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या वेब सीरिजचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. यामध्ये तिचा एक वेगळाच अंदाज पाहायला मिळत आहे.


माधुरीच्या बोलण्याची पद्धत, तिचा लूक, मुलींबरोबरचे तिचे संभाषण, तिचे डायलॉग या ट्रेलरमध्ये लक्ष वेधून घेत आहे. ती बिहारी ॲसेंट मध्ये बोलताना दिसत आहे. तसेच ती कॉमेडी करताना देखील पाहायला मिळत आहे. तिने आतापर्यंत साकारलेल्या पात्रांपेक्षा हे पात्र वेगळे आहे. ती या वेब सीरिजमध्ये आईच्या भूमिकेत आहे. तसेच तिला दोन मुली आहेत. सगळ्यांचे स्वभाव वेगळे असल्याचे दिसते. त्याच्यांत शाब्दिक चकमक देखील पाहायला मिळते.

मोठ्या मुलीच्या भूमिकेत अभिनेत्री तृप्ती डिमरी आहे, तर लहान मुलीच्या भूमिकेत अभिनेत्री धरणा दुर्गा आहे. मात्र, त्यांच्या आयुष्यात अशी घटना घडते की ज्यामुळे त्यांचे संपूर्ण आयुष्य बदलते. छोट्या-मोठ्या गमतीजमती देखील पाहायला मिळतात. ट्रेलरच्या शेवटी रवी किशनची यांची झलक पाहायला मिळते. तृप्ती डिमरी आणि माधुरी दीक्षितने याआधीही एकत्र काम केले आहे. भूल भुलैय्या ३मध्ये त्या एकत्र दिसल्या होत्या. आता या कलाकारांना पाहण्यासाठी चाहते उत्सुक असल्याचे पाहायला मिळत आहे.

तसेच, नुकत्याच पार पडलेल्या सोहळ्यात रवी किशन, माधुरी दीक्षित, तृप्ती डिमरी आणि धरणा दुर्गा एकत्र दिसले. यावेळी ते धक धक करने लगा या गाण्यावर हे कलाकार थिरकले असल्याचे पाहायला मिळाले.

दरम्यान, आता ही वेब सीरिज कधी प्रदर्शित होणार, नेमकी काय गोष्ट असणार, काय पाहायला मिळणार, रवी किशन यांची भूमिका काय असणार हे पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत.

# प्रियांकाने 'वाराणसी'साठी ठेवली खास अट



प्रियाका चोप्रा बॉलीवूडमधील एकेकाळची लोकप्रिय अभिनेत्री होती; पण हल्ली ती हॉलीवूडमधील चित्रपटांत काम करत असून बरीच वर्षं कुठल्याच हिंदी चित्रपटांत झळकलेली नाही. अशातच अभिनेत्री अनेक वर्षांनंतर भारतीय सिनेमात पुनरागमन करत आहे. प्रियांका राजामौलींच्या 'वाराणसी' या चित्रपटातून झळकणार असून, त्यामधून ती तेलुगू चित्रपटसृष्टीत पदार्पण आहे; पण प्रियांकानं चित्रपटात काम करण्यापूर्वी दिग्दर्शकासमोर एक अट ठेवली होती.

हिंदी चित्रपटात काम करत आपल्या अभिनयाद्वारे स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केल्यानंतर प्रियांकानं हॉलीवूडमध्येही स्वत:चं वेगळं स्थान निर्माण केलं; पण हॉलीवूडमध्ये काम करत असताना प्रियांका, हिंदी चित्रपटांमधील एक गोष्ट मिस करत आहे, असं तिनं सांगितलं आहे. प्रियांकानं एका मुलाखतीत तिनं कित्येक दिवस हिंदी चित्रपट केला नसून, त्यामुळे तिला बऱ्याच दिवसांपासून डान्स करण्याची इच्छा असल्याचं म्हटलं आहे.

प्रियांकाने ठेवलेली 'ही' अट

'सिनेमा ब्लाईंड'शी संवाद साधताना प्रियांका म्हणाली, "मी गेल्या सहा वर्षांत भारतीय चित्रपटात काम केलेलं नाहीये. त्यामुळे जेव्हा मला एस. एस. राजामौलींनी विचारलं आणि म्हणाले, "हे स्त्री पात्र खूप कुल आहे आणि तू याचा भाग असायला हवं वगैरे. तेव्हा मी त्यांना म्हटलं की, माझी एक विनंती आहे- मला डान्स करायचा आहे. हे शक्य आहे का? कारण- बराच काळ झालं मी डान्स केलेला नाही."

प्रियांका व महेश बाबू यांनी एकत्र दिलेल्या या मुलाखतीत महेश बाबू म्हणाला, "राजामौलींनी तिची इच्छा पूर्ण केली." प्रियांका त्यावर म्हणाली, "मी खरं तर विचारायला नको होतं. कारण- त्यामुळे आम्हाला खूप डान्स करावा लागला. आम्ही खूप डान्स केला आहे आणि बिचारा महेश मला म्हणत होता की, तुझ्यामुळे मलासुद्धा करावं लागत आहे." महेश बाबू पुढे म्हणाला, "खूप मजा आली आणि आम्ही एका गाण्याचं शूटिंगही पूर्ण केलं आहे. ते गाणं सतत आमच्या डोक्यात सुरू होतं आणि ती सतत ते गाणं गुणगुणत होती."

# "मराठीत अजूनही एकी नाही", मराठी अभिनेत्याचे स्पष्ट विधान



अशोक शिंदे यांनी एकाच दिवशी अनेक सिनेमे रिलीज होत असल्याचा फटका सर्वच सिनेमांना बसत असल्याचं सांगितलं. याबद्दल बोलताना त्यांनी स्वत:च्या एका सिनेमाचं उदाहरण सुद्धा दिलं. तसंच याबद्दल मराठीत एकी नसल्याचंसुद्धा त्यांनी स्पष्टपणे म्हटलं. एकत्र सिनेमे रिलीज होण्याबाबत अशोक शिंदे नेमकं काय म्हणालेत? चला जाणून घेऊ...

मराठी मनोरंजन विश्व या युट्यूब वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत अशोक शिंदे म्हणाले, "माफ करा. कुणी वैयक्तिक घेऊ नका. पण मराठीत ती एकी अजून नाही. एक उदाहरण देतो, एकीकडे संजय लीला भन्साली यांचा 'पद्मावत' आणि अक्षय कुमारचा 'पॅडमॅन' हे सिनेमे एकाच दिवशी रिलीज झाले होते. तेव्हा भन्साली यांचा सिनेमा आधी रिलीज झाला आणि अक्षयचा नंतर एका आठवड्याने रिलीज झाला. त्यांनी ठरवून हा निर्णय घेतला की 'पद्मावत' आधी रिलीज व्हावा आणि 'पॅडमॅन' नंतर. एखाद्या सिनेमाचा विषय चांगला असेल, तर तो पुढच्या आठडव्यात पोहोचतोच. पण सुरुवातीचे जी कमाई असते, ती प्रत्येक सिनेमाला महत्त्वाची असते. वेगवेगळ्या आठवड्यात सिनेमे रिलीज झाल्याने सुरुवातीच्या कमाईचा फायदा त्या दोन्ही सिनेमांना झाला."

पुढे ते म्हणाले, "असं माझ्या एका सिनेमाबाबत झालं होतं, लक्ष्मण उतेकर यांच्याबरोबर मी 'लालबागची राणी' सिनेमा केला होता, ज्याचे निर्माते होते बोनी कपूर. त्याचदिवशी पाच सिनेमे रिलीज होत असल्याचं बोनी कपूर यांनी मला फोन करून सांगितलं. त्यावर मी चित्रपट महामंडळांच्या अध्यक्षांना सांगून इतर पाच चित्रपटांच्या निर्मात्यांना भेटलो. 'आपण एकेक आठवडा वाटून घेऊ', असं मी त्यांना म्हटलं. त्यावर त्यांची प्रतिक्रिया होती की, 'तुम्ही हिंदीवाल्यांना मदत का करताय?' त्यावर मी म्हटलं, 'अजिबातच नाही. मी महाराष्ट्रीयन आहे, मराठी आहे, भाषेचा मला अभिमान आहे. पण यात हिंदी-मराठी असं न करता आपण व्यवसाय म्हणून बघू. कारण यात सगळ्यांचेच पैसे गुंतले आहेत'. त्यावर दोन निर्माते म्हणाले की 'आपण मराठी माणसं आहोत. आम्ही तारीख बदलणार नाही. कारण आमचा सिनेमा 'शोले' आहे. माझ्या सिनेमांबद्दल मला विश्वास आहे की ते चालणार.'"

यानंतर अशोक शिंदे म्हणाले, "शेवटी एका दिवशी पाच सिनेमे आलेच. त्यात दोन हिंदी असतातच, दोन दाक्षिणात्य सिनेमेसुद्धा, त्यात आणखी हॉलीवूड, आसामी, भोजपुरी आणि आता गुजरातीसुद्धा येत आहेत. सगळ्यांना वेळ वाटून दिल्यानंतर तेव्हा आम्हाला सकाळी ७, दुपारी ११, संध्याकाळी ४ आणि पुन्हा रात्री ११ असे शो मिळाले. यामुळे क्लेश सुरू होतात. हेच रिलीज जर एकेक आठवड्यांत केलं असतं, तर प्रेक्षकांकडेसुद्धा चॉइस असतो. त्यामुळे माझं मत आहे की, आपण विचार करून सिनेमे रिलीज करत नाहीत, तोपर्यंत मराठीत 'बाहुबली' होणारच नाही."

# RO-KO 2027 चा वर्ल्डकप खेळणार?

## भारतीय संघाचा माजी कर्णधार एमएस धोनीचे मोठं वक्तव्य

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारताचे अनुभवी फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी कसोटी आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. दोघेही केवळ वनडे क्रिकेट संघाचा भाग आहेत. एकच फॉरमॅट खेळून सुद्धा दोघांच्या फलंदाजीतील धार काही कमी झालेली नाही. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही बलाढ्य संघांविरूद्ध झालेल्या मालिकेत विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोन्ही अनुभवी फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडला होता.**

दोघेही वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेनंतर निवृत्ती घेणार, असं म्हटलं जात आहे. दरम्यान विराट आणि रोहित ही जोडी वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धा खेळणार का? याबाबत भारताचा माजी कर्णधार एमएस धोनीला प्रश्न विचारण्यात आला होता. यावर एमएस धोनीने दिलेलं उत्तर सध्या तुफान चर्चेत आहे.

भारताचा माजी कर्णधार एमएस धोनीने नुकताच एका खाजगी कार्यक्रमात हजेरी लावली होती. या कार्यक्रमातील चर्चेदरम्यान त्याला, विराट कोहली आणि रोहित शर्मा ही जोडी वर्ल्डकप २०२७ स्पर्धा खेळणार का? याबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. यावर आपली प्रतिक्रिया देताना धोनी म्हणाला, “त्यांनी पुढचा वर्ल्ड कप का खेळू नये? माझ्यासाठी वय हा कोणताही निकष नाही. कामगिरी आणि फिटनेस सर्वात महत्त्वाचे आहे. मला वाटतं की कोणालाही काही सांगण्याची गरज नाही, पण गोष्टी स्पष्ट असायला हव्या. प्रत्येकासा समान वागणूक दिली गेली पाहिजे.”





तसेच एमएस धोनीने खेळाडूंना आपल्या कामगिरीवर लक्ष केंद्रीत करण्याचा सल्ला दिला आहे. तो म्हणाला, “जर ते चांगली कामगिरी करत असतील आणि त्यांच्या मनात देशासाठी सातत्याने चांगलं करण्याची जिद्द असेल, तर का नाही? तुम्हाला अनुभवी खेळाडू कसे मिळणार? जोपर्यंत तो सचिन तेंडुलकर नाही, तोपर्यंत तुम्ही २० वर्षांच्या खेळाडू कडून अपेक्षा करू शकत नाही. प्रत्येकाला समान लेखलं पाहिजे. जर ते चांगली कामगिरी करत असतील, तर ते नक्कीच संघात असतील.”

विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोघांनी आपल्या दमदार कामगिरीच्या बळावर संघातील स्थान कायम ठेवलं आहे. विराटने ऑस्ट्रेलियाविरूद्ध झालेल्या मालिकेतील शेवटच्या सामन्यात नाबाद ७४ धावांची खेळी केली होती. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेविरूद्ध झालेल्या मालिकेत त्याने लागोपाठ २ शतकं आणि १ अर्धशतक झळकावलं होतं. त्यानंतर विजय हजारे ट्रॉफीतही त्याने शतक झळकावलं होतं. तर रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या वनडे मालिकेत खेळताना २०२ धावा केल्या होत्या.

# दिल्लीची सलग चौथ्यांदा फायनलमध्ये धडक!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धा शेवटच्या टप्प्यात पोहोचली आहे. स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने स्पर्धेतील गुणतालिकेत अव्वल स्थानी राहून फायनलचं तिकीट मिळवलं. तर स्पर्धेतील एलिमिनेटरचा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायंट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने दमदार कामगिरी करून गुजरातवर ७ गडी राखून एकतर्फी विजयाची नोंद केली. यासह स्पर्धेतील फायनलमध्ये प्रवेश केला आहे. दिल्ली कॅपिटल्सने सलग चौथ्यांदा या स्पर्धेतील फायनलमध्ये प्रवेश केला.**




महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेतील फायनलचा सामना ५ फेब्रुवारीला खेळवला जाणार आहे. हा सामना वडोदऱ्यातील बीसीए स्टेडियम कोटांबी येथे खेळवला जाणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता सुरू होणार आहे. तर नाणेफेक अर्ध्या तासाआधी म्हणजेच, ६:३० वाजता होईल. या सामन्याचे लाईव्ह प्रक्षेपण तुम्ही स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर पाहू शकता. यासह तुम्हाला जर हा सामना ऑनलाईन पाहायचा असेल किंवा सामन्याचे लाईव्ह स्ट्रिमिंग पाहायचे असेल, तर तुम्ही जिओ हॉटस्टारवर लाईव्ह पाहू शकता.

महिला प्रीमियर लीग स्पर्धेत या दोन्ही संघांचा हेड टू हेड रेकॉर्ड पाहिला, तर दिल्ली कॅपिटल्स संघाचं पारडं जड आहे. आतापर्यंत या स्पर्धेतील ४ हंगामात दोन्ही संघ ९ वेळा आमनेसामने आले आहेत. यादरम्यान दिल्ली कॅपिटल्स संघाने ६ वेळा बाजी मारली आहे. तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने केवळ ३ सामने जिंकले आहेत. या हंगामात दोन्ही संघ २ वेळा आमनेसामने आले होते. यापैकी एका सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने ८ गडी राखून बाजी मारली. तर एका सामन्यात दिल्ली कॅपिटल्स संघाने ७ गडी राखून विजयाची नोंद केली.




रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाची कर्णधार स्मृती मानधनाकडे ऑरेंज कॅप पटकावण्याची संधी असणार आहे. स्मृतीने या हंगामात फलंदाजी करताना ८ सामन्यांमध्ये ४८.३३च्या सरासरीने २९० धावा केल्या आहेत. या हंगामात सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत ती तिसऱ्या स्थानी आहे. तर मुंबई इंडियन्स संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर या यादीत अव्वल स्थानी आहे. हरमनप्रीत कौरने ३४२ धावा केल्या आहेत. तर स्मृती मानधनाला ऑरेंज कॅपच्या शर्यतीत अव्वल स्थानी यायचं असेल, तर तिला आणखी ५३ धावा कराव्या लागणार आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
# महाईन्यूज™
ePaper
। गुरूवार ।
दि. 05 फेब्रुवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## वाहतूक कोंडी नागरिकांसाठी डोकेदुखी : नवनिर्वाचित नगरसेवकांकडून कार्यवाहीची अपेक्षा

# पुनावळे अंडरपासची "कोंडी" कधी सुटणार?






**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे-मुंबई महामार्गावरील पुनावळे अंडरपास वाहतूक जाममुळे वाहनचालक आणि स्थानिक रहिवाशांसाठी गंभीर डोकेदुखी ठरत आहे. सकाळी आणि संध्याकाळी ट्रॅफिक रांगा अनेक किलोमीटरपर्यंत वाढल्याने दैनंदिन जीवन प्रभावित झाले आहे.**

> "पुनावळे अंडरपास येथे पोलीस पाहिजेत आणि सीसीटीव्ही कॅमेरेही लावावे. दुसरी गोष्ट, लोकप्रतिनिधी आता निवडून आले आहेत, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज अंडरग्राउंड मार्ग लवकरात लवकर मोठा कसा होईल याकडे लक्ष द्यावे. लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे, हजारो फ्लॅट्स होत आहेत पण रस्ता वाढत नाहीये, त्यामुळे विकास करणे गरजेचे आहे. हा रस्ता झाल्यामुळे, बाजूला पडलेली पाच-पाच फूट रेतीवाळू खडी वाहनांना स्लिप करुन टाकते; विशेषत: दोनचाकी वाहनचालकांवर परिणाम होत आहे. त्यामुळे त्याची सफाई पंधरा दिवसातून नियमित करावी अशी मागणी आहे. – **बाळकृष्ण सुर्वे, स्थानिक नागरिक.**

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत या प्रभागातून भाजपाचे चार नगरसेवक – राहुल कलाटे, कुणाल व्हावळकर, श्रृती वाकडकर आणि रेश्मा भुजबळ – निवडून आले आहेत. नागरिक आता या नगरसेवकांकडून तातडीने कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत.

स्थानीय नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, कमीतकमी सहा ट्रॅफिक पोलीस सकाळी व संध्याकाळी तैनात करावेत, तसेच सीसीटीव्ही कॅमेरे लावून वाहतुकीवर नियंत्रण ठेवले पाहिजे. याशिवाय, अंडरपासच्या बाजूला पडलेली रेती, खडी आणि तुटलेले फुटपाथ वाहनचालकांसाठी गंभीर धोका निर्माण करत आहेत. नागरिकांनी साप्ताहिक सफाई आणि दुरुस्तीचे काम तात्काळ सुरू करण्याची मागणी केली आहे.

"लोकसंख्या वाढत आहे, रस्त्यांचा दर्जा राखणे आणि वाहतूक नियमन करणे अत्यावश्यक आहे. पुनावळेतून जांबे आणि परिसरात जाण्यासाठी अंडरग्राउंड मार्गाचा विकास दीर्घकालीन उपाययोजना करणे अपेक्षीत आहे. वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तातडीने उपाय न केल्यास भविष्यातील विकासाचे फायदे नागरिकांपर्यंत पोहोचणार नाहीत. पुणे-मुंबई महामार्गावरील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढत राहणार आहे. आम्ही कोणाकडे दाद मागायची, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



# पिंपरी-चिंचवडची तनू भान सर्वोत्तम NCC कॅडेट, पंतप्रधानांच्या हस्ते सुवर्णपदक

## विद्यापीठाच्या विद्यार्थिनीची प्रजासत्ताक दिन कॅम्पमध्ये ऐतिहासिक कामगिरी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**प्रजासत्ताक दिनाच्या परेडनंतर राजधानी दिल्लीतील करिअप्पा मैदानावर पार पडलेल्या एनसीसी रॅलीमध्ये महाराष्ट्राच्या कन्येने आपल्या अद्वितीय कर्तृत्वाचा झेंडा फडकवला आहे. महाराष्ट्र संचालनालयाची ज्युनिअर अंडर ऑफिसर तनु भान हिने आर्मी विंगमधून (सीनियर विंग) देशातील 'सर्वोत्कृष्ट कॅडेट' (BEST CADET) हा सर्वोच्च बहुमान प्राप्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज एका दिमाखदार सोहळ्यात तनु भान हिला सुवर्ण पदक आणि मानाची 'केन' देऊन गौरविण्यात आले.**



यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि एनसीसीचे महासंचालक लेफ्टिनेंट जनरल वीरेंद्र वत्स यांची विशेष उपस्थिती होती.

देशभरातील १७ संचालनालयांमधील २० लाख कॅडेट्सच्या कडव्या स्पर्धेत, तनुने आपल्या अद्वितीय शिस्तीच्या आणि अष्टपैलू कौशल्याच्या जोरावर हे ऐतिहासिक यश खेचून आणले. 'राष्ट्र प्रथम – कर्तव्यनिष्ठ युवा' या ब्रीदवाक्याला सार्थ ठरवत, तिने प्रशिक्षणातील सर्व कठीण टप्पे यशस्वीपणे पार करत देशात प्रथम क्रमांक पटकावला.

या प्रसंगी कॅडेट्सना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुणांच्या राष्ट्रभक्तीचा गौरव केला. पंतप्रधान म्हणाले की, "आज समोर असलेले हे तरुण केवळ गणवेशातील कॅडेट्स नसून, ते 'विकसित भारत'चे निर्माते आहेत. तुमचे परिश्रम, त्याग आणि अनुशासन हेच देशाला प्रगतीपथावर नेणारे मुख्य आधारस्तंभ आहेत." 'राष्ट्र प्रथम – कर्तव्यनिष्ठ युवा' या संकल्पनेचा उल्लेख करत त्यांनी तनु भान आणि इतर विजेत्यांचे विशेष कौतुक केले. ही वचनबद्धता देशाला उज्ज्वल भविष्याकडे नेईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# महापालिका राष्ट्रवादी गटनेतेपदी भाऊसाहेब भोईर!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील अनुभवी व ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब सोपानराव भोईर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. सहा वेळा नगरसेवक म्हणून निवडून आलेले भाऊसाहेब भोईर हे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या निवडीमुळे महापालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सक्षम व अनुभवी नेतृत्व मिळाल्याची भावना पक्ष कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.**



### कला क्षेत्रात योगदान...

- राज्यस्तरीय गडकरी करंडक एकांकिका स्पर्धा, बालनाट्य शिबिरे, 'पिंपरी-चिंचवड आयडॉल'सारखे उपक्रम, मोफत तालीम केंद्र यांमधून त्यांनी असंख्य कलाकार घडवले. चित्रपट निर्मिती, नाट्यनिर्मिती व अभिनय क्षेत्रातही त्यांनी भरीव कामगिरी केली आहे.
- सामाजिक व सांस्कृतिक कार्यासाठी त्यांना अनेक मानाचे पुरस्कार मिळाले असून, त्यात पिंपरी-चिंचवड भूषण, यशवंतराव चव्हाण पुरस्कार, नाट्यवैभव, जीवनगौरव यांचा समावेश आहे. त्यांच्या गटनेतेपदी झालेल्या निवडीमुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक प्रभावीपणे भूमिका मांडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

भाऊसाहेब भोईर हे दिवंगत नेते अजित पवार यांचे विश्वासू सहकारी मानले जात असून, त्यांनी गेल्या अनेक दशकांपासून पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासासाठी सातत्यपूर्ण काम केले आहे. सन १९९२ मध्ये सर्वात तरुण नगरसेवक म्हणून त्यांनी महापालिकेत प्रवेश केला. त्यानंतर २०२६ पर्यंत सहा वेळा ते नगरसेवक म्हणून निवडून आले असून, विरोधी पक्षनेते, विधी समिती सदस्य, शिक्षण समिती सदस्य, वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या आहेत.

राजकारणासोबतच सांस्कृतिक क्षेत्रातही भाऊसाहेब भोईर यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे.

> "महापालिका निवडणुकीत अजितदादा पवार यांनी भाजपाच्या भ्रष्टाचारावर आवाज उठवला होता. भाजपासोबत सत्तेत बसणे म्हणजे अजितदादांच्या विचारांचा अवमान होईल. भाजपाच्या चुकीच्या कामांना विरोध करणे हिच अजितदादांना खरी श्रद्धांजली ठरणार आहे.
>
> – भाऊसाहेब भोईर, विरोधी पक्षनेते, राष्ट्रवादी.



सन १९९६ मध्ये त्यांनी पिंपरी-चिंचवड शहरात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या शाखेची स्थापना केली. गेली २९ वर्षे ते या शाखेचे बिनविरोध अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली ७९ वे आणि ऐतिहासिक १०० वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन, तिसरे अखिल भारतीय लोककला संमेलन, उर्दू साहित्य संमेलन यांसारखे भव्य सांस्कृतिक सोहळे यशस्वीरीत्या पार पडले.

# ‘ज्ञानरथाचा सारथी हरपला’; अजितदादांच्या आठवणीने पुणेकर शिक्षणतज्ज्ञ गहिवरले

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिरात शोकसभा

**महाईन्यूज | पुणे**

**“राज्याच्या राजकारणातील आणि समाजकारणातील एक धडाकेबाज नेतृत्व, सामान्यांच्या मुलांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचवणारे ‘ज्ञानरथाचे सारथी’ अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे,” अशा भावना पुणे जिल्ह्यातील विविध शिक्षण संस्थांच्या वतीने व्यक्त करण्यात आल्या. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाने आयोजित केलेल्या शोकसभेत दादांच्या आठवणींना उजाळा देताना अनेक दिग्गजांच्या अश्रूंचा बांध फुटला.**



### आठवणी सांगताना दाटून आला कंठ

दादांनी कार्यकर्त्यांवर आणि संस्थाचालकांवर दाखवलेला विश्वास आणि दिलेली शाबासकीची थाप आठवून पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव ॲड. संदीप कदम यांना भर सभागृहात अश्रू अनावर झाले. हीच अवस्था इतर मान्यवरांचीही होती. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी दादांचा उल्लेख ‘महाराष्ट्राचे ब्रँड नेते’ असा केला. अर्थमंत्री म्हणून त्यांनी शिक्षणासाठी कायमच तिजोरीचे दार उघडे ठेवल्याचे त्यांनी नमूद केले.

### स्मृती जतन करण्याचा संकल्प

अजितदादांच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी विविध संस्थांनी काही महत्त्वपूर्ण संकल्प सोडले आहेत दादांच्या नावाने स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणे. पुणे विद्यापीठात अध्यासन केंद्र सुरू करणे आणि सुवर्णपदक देणे. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या जीवनपटाचा समावेश करणे. त्यांच्या कार्याचे भव्य दालन (म्युझियम) उभारणे आणि वृक्षारोपण करणे.

या शोकसभेला अतिरिक्त जिल्हाधिकारी सतीश राऊत, राहुल कराड, डॉ. विवेक सावंत, आमदार चेतन तुपे, विलास लांडे, डॉ. अरुण अडसूळ यांच्यासह जिल्ह्यातील शेकडो शिक्षणप्रेमी आणि पदाधिकारी उपस्थित होते. साहित्यिक वि. दा. पिंगळे यांनी सूत्रसंचालन केले.

### बालगंधर्व रंगमंदिरात शोकाकुल वातावरण

मराठवाडा मित्रमंडळाचे कार्यकारी अध्यक्ष भाऊसाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली ही शोकसभा पार पडली. यावेळी बोलताना जाधव म्हणाले की, “कामाचा माणूस हीच दादांची खरी ओळख होती. त्यांच्यासारखा शिस्तप्रिय आणि तत्पर नेता पुन्हा होणे नाही.” रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी यांनी दादांच्या दूरदृष्टीचे उदाहरण म्हणून बारामतीच्या विद्या प्रतिष्ठानचा उल्लेख केला, तर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष एस. के. जैन यांनी पिंपरी-चिंचवडच्या विकासातील दादांचे योगदान अधोरेखित केले.

### अपूर्ण राहिलेले स्वप्न

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बाबा शिंदे यांनी एक भावूक आठवण सांगितली. “पवार कुटुंबीय ज्या शाळेत दहावीपर्यंत शिकले, ती शाळा आधुनिक दर्जाची करण्याचे दादांचे स्वप्न होते, जे दुर्दैवाने अपूर्ण राहिले,” असे त्यांनी सांगितले. प्रोग्रेसिव्ह शिक्षण संस्थेचे डॉ. गजानन एकबोटे आणि ‘लोकमत’चे संपादक संजय आवटे यांनीही दादांच्या धडाकेबाज कार्यपद्धतीचे किस्से सांगितले.

---

# एमआयडीसी परिसरात अजितदादांचे स्मारक उभारावे : संदीप बेलसरे

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरामध्ये असणाऱ्या एमआयडीसी मधील लघुउद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी कायम सकारात्मक भूमिका उपमुख्यमंत्री अजितदादा पवार घेत असत. येथील विज, पाणी, रस्ते, वाहतूक समस्या, मिळकत कर, संघटनेला जागा देणे, लघु उद्योजकांचे पुनर्वसन करणे अशा अनेक प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी कायम तत्परता दाखवून सकारात्मक भूमिका घेऊन वेळोवेळी प्रश्नांची सोडवणूक केली, अशा भावना उद्योजकांनी व्यक्त केल्या आहेत.**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे २८ फेब्रुवारी रोजी विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या स्मृती लघु उद्योजकांनी कायम जतन कराव्यात आणि पुढील पिढीस मार्गदर्शक ठराव्यात यासाठी पिंपरी चिंचवड एमआयडीसी परिसरात स्व. अजित दादा पवार यांचे स्मारक उभारावे यासाठी आपण पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या माध्यमातून महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करू, हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल असे पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि त्याच्यासोबत विमानात असणाऱ्या इतर ४ व्यक्तींचा २८ फेब्रुवारी रोजी बारामती येथे विमान अपघातात मृत्यू झाला. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पिंपरी चिंचवड लघु उद्योग संघटनेच्या वतीने सोमवारी मोशी प्राधिकरण सेक्टर ४, येथील पर्ल बँक्वेट हॉल येथे श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष विनोद नाणेकर, सचिव जयंत कड, प्रसिद्धी प्रमुख विजय खळदकर, संचालक संजय सातव, विनोद मित्तल, नवनाथ वायाळ, भारत नरवडे, अतुल इनामदार, सचिन आदक तात्या सपकाळ, सुरेश म्हेत्रे, संजय भोसले, माणिक पडवळ, बशीरभाई तरसगार आदी लघु उद्योजक उपस्थित होते.




यावेळी सुरेश म्हेत्रे म्हणाले की, लघु उद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी कायम तत्पर असणाऱ्या अजितदादा पवार यांच्या अकाली जाण्यामुळे संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. पिंपरी चिंचवड मधील लघु उद्योजकांच्या दृष्टीने अजितदादा पवार हे लोहपुरुष होते. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी येथे एखादा प्रकल्प सुरू करावा.

### उद्योजकांना अजितदादांचे पाठबळ..

संजय आहेर यांनी सांगितले की, पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटना बरोबरच राज्यातील सर्वच लघुउद्योजकांना अजितदादा पवार नेहमी पाठबळ देत होते. पिंपरी चिंचवड एमआयडीसी ला अजित नगर असे नाव देण्यात यावे यासाठी संघटनेच्या वतीने प्रयत्न करावेत. हर्षल थोरवे म्हणाले की, सर्व लहान थोरांच्या मनात घर केलेला आपला माणूस गमावल्याची भावना आहे. इतरही लघु उद्योजकांनी आपल्या भावना व्यक्त करून श्रद्धांजली वाहिली. दोन मिनिटे शांत उभे राहून सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व पसायदान म्हणून श्रद्धांजली सभा विसर्जित करण्यात आली.

# ३४८ विद्यार्थी राज्य पुरस्काराचे मानकरी

## अजितदादांच्या दूरदृष्टीतून उभ्या राहिलेल्या शिक्षण व्यवस्थेचे सुवर्ण फळ

**महाईन्यूज । पौड**

**महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय राज्यपुरस्कार चाचणी शिबिराचा निकाल नुकताच जाहीर झाला. या निकालात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या (PDEA) तब्बल ३४८ विद्यार्थ्यांनी बाजी मारत राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात एक नवा इतिहास रचला आहे.**

संस्थेच्या या यशाने गतवर्षीचा स्वतःचाच उच्चांक मोडीत काढला असून, राज्यामध्ये सर्वाधिक पुरस्कार मिळविणारी संस्था म्हणून मान मिळवला आहे. मात्र, या यशाचा आनंद साजरा करण्याऐवजी विद्यार्थ्यांनी हे यश संस्थेचे दिवंगत अध्यक्ष अजित पवार यांना समर्पित करून एक अनोखी श्रद्धांजली वाहिली आहे.

विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकास व्हावा, यासाठी अजित पवार यांनी संस्थेच्या प्रत्येक शाखेत स्काऊट-गाईड उपक्रम राबवण्याचे आदेश दिले होते. त्यांच्याच प्रेरणेतून संस्थेच्या ३० शाळांमधील १५० मुले (स्काऊट) आणि १९८ मुली (गाईड) अशा एकूण ३४८ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश संपादन केले. या विद्यार्थ्यांना १० वीच्या परीक्षेत वाढीव ३ गुणांचा लाभ मिळणार आहे.

> राज्यात सर्वाधिक पुरस्कार मिळवणे हे केवळ योगायोगाने घडलेले नाही, तर त्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत आणि संस्थेने केलेले काटेकोर नियोजन कारणीभूत आहे. दादांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही प्रत्येक शिक्षकाचे प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सराव शिबिरांकडे वैयक्तिक लक्ष दिले होते. आज मिळालेला हा ऐतिहासिक निकाल म्हणजे दादांना वाहिलेली कृतीशील श्रद्धांजली आहे.
>
> – ॲड. संदीप कदम, मानद सचिव, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ

> "संस्थेचे अध्यक्ष स्वर्गीय अजितदादा पवार साहेब विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर नेहमीच भर देत असत. त्यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेतूनच हे यश मिळाले आहे. मात्र, निकाल ऐकण्यासाठी ते आज आपल्यात नाहीत, याचे मोठे दुःख आहे."
>
> – शारदा अशोक मदने, उपशिक्षिका, श्री शहाजी विद्यालय, सुपे

### यशाचा प्रवास आणि चाचणी शिबिर

या परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने विशेष चाचणी शिबिरे घेण्यात आली होती. त्यानंतर १६ ते २३ जानेवारी दरम्यान भोर येथे झालेल्या राज्यस्तरीय चाचणी शिबिरात या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. मुळशी, बारामती, जुन्नर, इंदापूर, पुरंदर, खेड, दौंड, शिरूर, मावळ आणि हवेली अशा विविध तालुक्यातील संस्थेच्या शाळांनी या यशात आपला वाटा उचलला आहे.



> संस्थेचे अध्यक्ष स्वर्गीय अजितदादा पवार साहेब नेहमी म्हणायचे की, ग्रामीण भागातील विद्यार्थी केवळ पुस्तकी ज्ञानातच नव्हे, तर शिस्त आणि शारीरिक क्षमतेतही अव्वल असायला हवा. त्यांच्या याच 'व्हिजन'मुळे आम्ही प्रत्येक शाखेत स्काऊट-गाईड सक्तीचे आणि प्रभावी केले. आज ३४८ विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश दादांच्या दूरदृष्टीचा विजय आहे. हे यश आम्ही त्यांना अत्यंत नम्रपणे समर्पित करतो.
>
> – राजेंद्र घाडगे, उपाध्यक्ष, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ

### शाबासकीची द्यायला दादा हवे होते

निकालाचे वृत्त समजताच संस्थेच्या वर्तुळात आनंदाचे वातावरण पसरले असले तरी, मार्गदर्शक आणि विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत पाणी होते. "हे यश पाहण्यासाठी आणि आमच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्यासाठी आज दादा हवे होते," अशी भावना शिक्षकांनी व्यक्त केली. या यशाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲड. संदीप कदम, खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव ए. एम. जाधव यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले आहे.

# इंटर झोनल क्रिकेट स्पर्धेत जयहिंद पॉलीटेक्निक संघ विजेता

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन इंटर झोनलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकच्या मुलांच्या संघावर नारायणगाव, कुरण येथील जयहिंद पॉलीटेक्निक संघाने १४ धावांनी विजय मिळवला. संघ प्रमुख वरद सराफ, जय तारक, जय शर्मा यांच्या अष्टपैलू खेळामुळे हे यश मिळाले. अंतिम सामन्यात गोलंदाज मयूर धांडे, वरद सराफ यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून उत्कृष्ट गोलंदाजी केली.**





वाघोली येथील भिवराबाई सावंत पॉलिटेक्निक येथे आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धेत डी १ झोन मधील पॉलिटेक्निकच्या १४ संघांनी सहभाग घेतला होता.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक (पीसीपी) संघाला संघ व्यवस्थापक एस.एस. धानूरे, सोमनाथ खेडेकर, रुपेश पवार, प्रविण नाईक क्रीडा समन्वयक, सुनील जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी थरकुडे प्राचार्य डॉ. विद्या बॅंकॉड यांनी मार्गदर्शन केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.